# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.01.2026** **वारःगुरुवार**

1. लघु उद्योग विकास बँक म्हणजेच सिडबीला, उद्योगवाढीसाठी पाच हजार कोटी रुपयांच्या समभाग साहाय्य देण्यास मंजुरी
2. महाराष्ट्रातील सर्व मोठे सौर ऊर्जा प्रकल्प या वर्षाअखेरपर्यंत पूर्णत्वास जातील-मुख्यमंत्र्यांची दावोस बैठकीत घोषणा
3. ग्रीनलँडवर जबरदस्तीनं ताबा घेणार नाही, मात्र अमेरिकेच्या विस्तारवादात नाटोनं खोडा घालू नये-राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रंप यांची स्पष्टोक्ती आणि
4. न्यूझीलंडविरुद्ध वीस षटकांच्या पहिल्या सामन्यात भारताचा 48 धावांनी विजय

**मंत्रीमंडळ-सिडबी**

दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत काल, लघु उद्योग विकास बँक म्हणजेच सिडबीला, उद्योगवाढीसाठी पाच हजार कोटी रुपयांच्या समभाग साहाय्य देण्यास मंजुरी दिली आहे. या साहाय्यामुळे देशातल्या साडेपंचवीस लाखांहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्य उद्योगांना फायदा होणार आहे. यामुळे येत्या दोन वर्षांत आर्थिक साहाय्य मिळणाऱ्या सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांची संख्या एक कोटींहून अधिक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तीस सप्टेंबर 2025 पर्यंत जाही करण्यात आलेल्या अद्ययावत आकडेवारीनुसार, जवळपास सात कोटी उद्योगांनी आत्तापर्यंत तीस कोटींहून थोडे अधिक रोजगार निर्मिती केली आहे. या सरासरीचा विचार करता, येत्या दोन वर्षांत एक कोटींहून अधिक रोजगार संधी निर्माण होण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

**मंत्रीमंडळ-अटल**

मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत, असंघटित क्षेत्रातील कामगारांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्यासाठी 2015 मध्ये सुरू झालेल्या अटल पेन्शन योजनेला मंत्रिमंडळाने काल 2031 पर्यंत मुदत वाढ देण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या प्रचार आणि विकास यांच्यासाठी निधी देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. योजनेत नागरिकाने दिलेल्या योगदानावर अवलंबून, वयाच्या साठ वर्षांनंतर एक हजार ते पाच हजार प्रति महिना निवृत्तीवेतनाची हमी देणाऱ्या या योजनेचा लाभ आतापर्यंत साडेआठ कोटींहून अधिक लाभार्थ्यांनी घेतला आहे.

**महाराष्ट्र-सौर**

महाराष्ट्रातील सर्व मोठे सौर ऊर्जा प्रकल्प या वर्षाअखेरपर्यंत पूर्णत्वास जातील अशी घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. शेतकऱ्यांना स्थिर सौर ऊर्जा पुरवठा करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पांचे आरेखन करण्यात आल्याचे फडणवीस म्हणाले. दावोसमध्ये 19 ते 23 जानेवारी दरम्यान सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या 56 व्या वार्षिक बैठकीत फडणवीस सहभागी झाले आहेत. आंतरराष्ट्रीय बैठकांमध्ये सहभागी झाल्यामुळे राज्याला जागतिक स्तरावरच्या व्यावसायिक घडामोडींची माहिती मिळते, त्यामधून महाराष्ट्रासाठी अधिक गुंतवणूक आणि आधुनिक प्रणाली आणण्यास मदत मिळते असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. दावोस येथील जागतिक आर्थिक मंच 2026 मध्ये केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी जागतिक गुंतवणूकदारांना स्वच्छ ऊर्जेच्या जलद विस्तारात भारतासोबत भागीदारी करण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर, मुंबई विमानतळाजवळ अत्याधुनिक नवोन्मेष शहर म्हणजेच इनोव्हेशन सिटी विकसित करण्याची घोषणाही यावेळी फडणवीस यांनी केली. या प्रकल्पासाठी टाटा समूह 11 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. स्टार्टअप समुदायाला पाठिंबा देण्यासाठी विशेष

तयार करण्यात आलेली प्लग अँड प्ले ही परिसंस्था उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

**<u>महाराष्ट्र-पेण विकास</u>**

महाराष्ट्र सरकारच्या वतीनं मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रायगड जिल्ह्यातल्या पेण तालुक्यात विकास केंद्र उभारण्यासाठी काल दावोस इथं विविध जागतिक कंपन्यांसमवेत सामंजस्य करार केले. तिसरी मुंबई म्हणून संकल्पित असलेला हा प्रकल्प, तंत्रज्ञान, अर्थतंत्र आणि डेटा सेंटरसाठी अत्याधुनिक केंद्र म्हणून उदयास येणार आहे. रायगड हा भारताचा पहिला समर्पित जागतिक क्षमता केंद्र म्हणून ओळखला जाणार आहे. जागतिक कंपन्यांनी या विकास केंद्राला गुंतवणूक आणि प्रमुख व्यवसाय म्हणून विचारात घेण्याचे आमंत्रण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

**<u>कृत्रिम बुद्धीमत्ता</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नियमनसाठी केवळ स्वतंत्र कायद्यावर अवलंबून न राहाता तंत्र-कायदा दृष्टीकोन अवलंबण्याची गरज असल्याचे केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. दावोस इथं जागतिक आर्थिक मंच परिषदेदरम्यानच्या एका सत्रात ते सहभागी झाले होते. पूर्वग्रह आणि डीप फेक यांसारख्या धोक्यांना सामोरे जाताना, न्यायालयीन छाननीला सामोरे जाऊ शकणाऱ्या अचूक शोध प्रणालींचा समावेश असलेल्या बळकट तांत्रिक साधनांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**<u>ग्रीनलँड</u>**

ग्रीनलँडवर नियंत्रणासाठी बळाचा वापर करणार नसल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे मात्र आरटिक बेटाची मालकी वॉशिंग्टनकडे द्यावी या मागणीचा त्यांनी पुनरूच्चार केला आहे. दावोसमध्ये आर्थिक मंचाच्या परिषदेला संबोधित करताना ग्रीनलँडच्या अधिग्रहणासंदर्भात चर्चा करण्यासाठी तातडीने वाटाघाटी करू इच्छित असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रीनलँड हा डेन्मार्कचा अर्धस्वायत्त प्रदेश आहे. ग्रीनलँडने मात्र अमेरिकेचा भाग होण्याची इच्छा नसल्याचे म्हटले आहे. मात्र या बेटावर आधीपासूनच एक लष्करी तळ आहे.

दरम्यान, ग्रीनलँडवरील अमेरिकेच्या नियंत्रणाच्या मुद्द्यावरून युरोपमधील अमेरिकेच्या मित्र देशांवर लावण्यात येणारे नियोजित निर्यात शुल्क रद्द करत असल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. ट्रम्प आणि नाटो देशांच्या नेत्यांनी आरटिक सुरक्षेसंदर्भात, भविष्यात होणाऱ्या कराराच्या आराखड्यावर सहमती दर्शवल्यानंतर ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला आहे. ग्रीनलँडवर मालकी हक्क मिळवण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर काहीच तासांत हा निर्णय घेण्यात आला. यासाठी बळाचा वापर करणार नाही असे सांगतानाच युरोपिय मित्रराष्ट्रांविषयी उपहास व्यक्त करतानाच नाटोने अमेरिकेच्या विस्तारवादाला रोखण्याचा प्रयत्न करू नयेही असेही आपल्या दावोस इथल्या भाषणात म्हटलं आहे.

**<u>अणुउर्जा-जितेंद्र सिंह</u>**

भारत, अणुउर्जा कार्यक्रमाच्या निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, त्यासाठी सर्वोच्च सुरक्षा निकष कायम ठेवत ऊर्जा सुरक्षा बळकट करण्याच्या उद्देशाने सुधारणा केल्या जात असल्याचे विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी काल स्पष्ट केलं. दिल्लीत माध्यम प्रतिनिधींच्या गोलमेज परिषदेत संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. सरकारने अलीकडेच अणुउर्जा कायद्यांतर्गत तपशीलवार नियम तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आवश्यक सुरक्षा उपायांविषयी तडजोड न करता, सरकार अणु ऊर्जा क्षेत्र खाजगी आस्थापनांसह बिगर सरकारी सहभागासाठी खुले करत असल्याचेही सिंह यांनी सांगितले.

**<u>पुनरीक्षण-पश्चिम बंगाल</u>**

पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणासंदर्भात, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच आदेश निवडणूक आयोगाने अधिकाऱ्यांना तसे निर्देश दिले आहेत. त्यानुसार तार्किक विसंगती आणि

असूचीबद्ध श्रेणींमधील नावे सार्वजनिक करणे अनिवार्य आहे आणि याचा फटका बसलेल्या मतदारांना विहित मुदतीत कागदपत्रे सादर करण्याची आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची संधीही दिली जाणार आहे.

**अरवली**

अरवली पर्वतरांगांमधील खाणकाम आणि संबंधित समस्यांची सखोल आणि सर्वांगिण तपासणी करण्यासाठी क्षेत्र तज्ज्ञांची समिती स्थापन करणार असल्याचे काल सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. अरवली पर्वतरांगांमध्ये अवैध खाणकामामुळे अपरिर्वतनीय नुकसान होऊ शकते असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. खंडपीठाने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी आणि न्यायालयीन मित्र के. परमेश्वर यांना खाणकामात कौशल्य असलेल्या पर्यावरणतज्ञ आणि शास्त्रज्ञांची नावे चार आठवड्यांत सुचवण्याचे निर्देश दिले आहेत. ही समिती न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि देखरेखीखाली काम करेल असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

**नीतीआयोग**

नीति आयोगाने काल दिल्लीत सिमेंट, अल्युमिनियम आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आदी क्षेत्रांसाठी कार्बन डायऑक्साईडच्या उत्सर्जनामधील घट यांविषयीच्या आराखड्याचा अहवाल प्रकाशित केला. या दरम्यान नीति आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र तसेच भारताच्या विकासातील शाश्वत आर्थिक वाढ यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग बळ देण्याचे महत्त्व विषद करताना रोजगार, नवोन्मेष आणि सर्वसमावेशक विकास यांमधील महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले.

**पुणे ग्रँड टूर**

पुणे ग्रँड टूर-2026 सायकलिंग स्पर्धेच्या मराठा हेरिटेज सर्किट नावाच्या दुसऱ्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा सायकलपटू ल्यूक मडग्वे यानं सलग दुसरा विजय मिळवत 'यलो जर्सी'वरील आपलं वर्चस्व कायम राखलं. स्पर्धेचा तिसरा 134 किलोमीटरचा टप्पा आज सासवड-पुरंदर ते बारामती दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात काल पाच सामन्यांच्या मालिकेतील नागपूर इथं झालेला पहिला 20 षटकांचा सामना भारतानं 48 धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं अभिषेक शर्माच्या 35 चेंडूतील तडाखेबंद 84 आणि रिंकू सिंगच्या 20 चेंडूतील 44 धावांचा जोरावर पाहुण्यांसमोर 240 धावांचं आव्हान दिलं होतं. न्युझीलँडचा डाव 190 धावांवर संपुष्टात आला. ग्लेन फिलिप्स याने सर्वाधिक 78 धावा केल्या. शिवम दुबे आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. अभिषेक शर्मा याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**